# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 15 June 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १५ जून २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- चित्रपट क्षेत्राच्या वाढीसाठी केंद्र सरकार वचनबद्ध–मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनात केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांची ग्वाही.
- व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू यांना जाहीर.
- साहित्य अकादमीच्या बाल साहित्य पुरस्कारासाठी भारत सासणे यांची तर युवा पुरस्कारासाठी तुळजापूर इथले साहित्यक देविदास सौदागर यांची निवड.

आणि

- उन्हाळी सुट्यांनंतर शाळांमध्ये पुन्हा बालकांचा किलबिलाट–फुलं तसंच मिठाईने स्वागत.

****

चित्रपट क्षेत्राच्या वाढीसाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही, केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी दिली आहे. `मिफ` अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन डॉ मुरुगन यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. या महोत्सवात दिला जाणारा प्रतिष्ठेचा व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार विख्यात वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू यांना दिला जाणार असल्याची घोषणा डॉ मुरुगन यांनी केली. भारताला आशय निर्मितीचं जगातलं केंद्र म्हणून उभं करण्याचं सरकारचं धोरण असल्याचं मुरुगन यांनी सांगितलं. माहितीपट, लघुपट, तसंच ॲनिमेशन निर्मात्यांनी भारतात यावं, भारतात चित्रीकरण करावं असं आवाहन त्यांनी केलं. या उद्घाटन सत्रात `बिली अँड मॉली: ॲन ऑटर लव्ह स्टोरी हा चित्रपट दाखवण्यात आला. यंदा प्रथमच या महोत्सवात मुंबईसह पुणे, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नईमध्ये चित्रपटांचं प्रदर्शन

केलं जाणार आहे. यंदाच्या मिफमध्ये ५९ हून अधिक देशातल्या ६१ भाषांमधल्या ३१४ चित्रपटांचा समावेश करण्यात आला आहे.

****

विद्यार्थ्यांनी उच्चशिक्षण संस्थांमध्ये घेतलेला प्रवेश तीस सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास किंवा अन्य संस्थेत प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्काचा परतावा देणं संबंधित संस्थेला बंधनकारक राहणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोग – यूजीसीनं २०२४-२५ या वर्षासाठी शुल्क परतावा धोरण जाहीर केलं आहे. केंद्र किंवा राज्य सरकारांच्या अखत्यारीतल्या उच्चशिक्षणसंस्था, आयोगानं मान्यता दिलेल्या संस्था, तसंच अभिमत विद्यापीठं या सगळ्यांना हे धोरण लागू होणार आहे.

****

साहित्य अकादमीचे २०२४ या वर्षासाठीचे बाल साहित्य पुरस्कार तसंच युवा पुरस्कार आज जाहीर झाले. मराठीत भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूत बंगला' या कादंबरीला बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. तर युवा पुरस्कारात तुळजापूर इथले साहित्यक देविदास सौदागर लिखित 'उसवण' या कादंबरीची निवड करण्यात आली आहे. पन्नास हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असं दोन्ही पुरस्काराचं स्वरूप असून, पुरस्कार वितरणाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचं, साहित्य अकादमीनं जाहीर केलं आहे.

****

कापूस, सोयाबीन आणि इतर तेलबिया पिकातील मूल्यसाखळीस चालना देण्याच्या उद्देशाने राज्य पुरस्कृत विशेष कृती योजना राबवण्यात येत आहे. यासंदर्भात महा डिबीटी डॉट महाराष्ट्र डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर अर्ज करता येणार आहेत. प्राप्त अर्जातून ऑनलाईन पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करून, आवश्यक निविष्ठांचा पुरवठा करण्यात येणार असल्याचं, कृषी विभागाकडून कळवण्यात आलं आहे.

****

आगामी विधानसभा निवडणुका एकत्रितपणे लढवत, प्रत्येक जागेवर सक्षम उमेदवार देणार असल्याचं महाविकास आघाडीकडून सांगण्यात आलं आहे. आज मुंबईत पत्रकार परिषद घेऊन लोकसभा निवडणूक निकालाचं विश्लेषण तसंच विधानसभा निवडणुकीबाबत माहिती देण्यात आली. या पत्रपरिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख

उद्धव ठाकरे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या निवडणुकीत धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयत्न झाला मात्र जनतेने त्याला थारा दिला नाही, असं चव्हाण यांनी सांगितलं. तर उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोलतांना, महाविकास आघाडीवर टीका करणाऱ्यांनी केंद्र सरकारमध्ये सध्या झालेली युती ही नैसर्गिक आहे की अनैसर्गिक हे सांगावं, अशी मागणी केली. शरद पवार यांनी या वेळी बोलतांना, पंतप्रधानांनी महाराष्ट्रात सर्वाधिक सभा घेतल्या, तेवढ्या जास्ती जागांचा महाविकास आघाडीला लाभ झाल्याचं सांगत, उपरोधिकपणे पंतप्रधानांचे आभार मानले.

****

छत्तीसगडमध्ये आज झालेल्या चकमकीत आठ नक्षलवादी मारले गेले, तर दोन सैनिक जखमी झाले. इंडो तिबेट सीमा दल, जिल्हा राखीव दल आणि विशेष कृती दलानं आज बस्तर भागात ही कारवाई केली. सुरक्षा दलांकडून या परिसराची छाननी अद्याप सुरू असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

उन्हाळी सुट्टीनंतर राज्य शिक्षण मंडळाच्या शाळा आज पुन्हा एकदा मुलांच्या किलबिलाटाने भरून गेल्या. शाळांमध्ये पहिल्या दिवशी मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांचं स्वागत करण्यात आलं.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यात गाडीवाट इथं आदर्श प्राथमिक शाळेत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थित शाळा प्रवेशोत्सव सोहळा पार पडला. इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची सजावट केलेल्या वाहनातून मिरवणूक काढण्यात आली. शाळेच्या प्रवेशद्वारासह सर्व वर्ग खोल्यांची सजावट करण्यात आली होती. २४० विद्यार्थ्यांनी जपानी भाषेतून जिल्हाधिकारी स्वामी यांच्याशी संवाद साधला.

****

परभणी शहरातल्या अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच गुलाबाची फुलं देऊन स्वागत करण्यात आलं.

हिंगोली जिल्ह्यातही पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचं पुष्प देऊन अनेक शाळांमध्ये स्वागत करण्यात आलं, तसंच विद्यार्थ्यांना पुस्तकांचं वाटपही करण्यात आलं.

****

जालना शहरासह जिल्ह्यात ग्रामीण भागातल्या शाळांमध्ये पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत पाठ्यपुस्तकांचं वाटप करण्यात आलं. तसंच पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचं स्वागत करत, माध्यान्ह भोजनात मिष्टान्नाचं वाटप करण्यात आलं. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचं वातावरण पहायला मिळालं.

****

लातूर जिल्ह्यात 'माझं लातूर, हरित लातूर'या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून 'शाळेतील पहिलं पाऊल, वृक्ष लावून' हा उपक्रम राबवण्यात आला. लातूर तालुक्यातील वरवंटी इथल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची सजवलेल्या बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी या बैलगाडीचं सारथ्य केलं. शाळेच्या प्रवेशद्वारावर वाद्यांच्या गजरात या मुलांचं औक्षण करून आणि गुलाबपुष्प देवून शाळेमध्ये स्वागत झालं. जिल्ह्यातील शाळांमध्ये आज जवळपास १६ हजार विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतला, त्यांच्या हातून वृक्षारोपण करण्यात आल्याचं, प्रशासनाकडून सांगण्यात आलं.

दरम्यान, सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी दोन गणवेश दिले जाणार होते. मात्र आज शाळा सुरू झाल्या, तरीही राज्यभरातले ४८ लाख विद्यार्थी गणवेशापासून वंचित असल्याची टीका, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं माध्यमांशी बोलत होते. राज्य शासनाने या विषयाकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्याचं सांगत, सरकारचं हे धोरण गुत्तेदारांना पोसण्याचं असल्याचा आरोपही दानवे यांनी केला.

****

नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज एक आढावा बैठक घेत, आगामी वृक्ष लागवड मोहीम, लेक लाडकी योजनेतील लाभार्थ्यांची वृद्धी, शासनाच्या बांबू मिशनची अंमलबजावणी याबाबत माहिती घेतली. यावर्षी ५० कोटी वृक्ष लागवड मोहिमेप्रमाणे उद्दीष्ट घेऊन बांबू लागवड करण्यात यावी, यासाठी खासगी शाळांनी तसंच कृषी विभागाने पुढाकार घ्यावा, असे निर्देश राऊत यांनी दिले.

****

हिंगोली इथं महेश नवमी आणि जागतिक रक्तदान दिनाच्या अनुषंगाने माहेश्वरी युवा संघटनेच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आलं. या शिबिरात १११ तरुणांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केलं. दरवर्षी महेश नवमीनिमित्त माहेश्वरी युवा संघटनेच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात येतं, यावर्षीही या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

तुळजापूर इथं तुळजाभवानी मंदिर प्रशासकीय कार्यालयासमोर हिंदुत्वनिष्ठ आणि समविचारी संघटनांनी आज घंटानाद आंदोलन केलं. तुळजाभवानी मंदिरातील गैरव्यवहार प्रकरणी गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत, मात्र महिनाभराचा कालावधी उलटूनही याबाबत काहीही कारवाई न झाल्यानं हे आंदोलन केल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

****

आषाढी वारीसाठी पंढरपूरला निघालेली संत श्रेष्ठ गजानन महाराज यांची पालखी आज अकोल्यात दाखल झाली. यंदा पालखीचं पंचावन्नावं वर्ष आहे. शहरातील ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून पालखीचं मोठ्या उत्साहात स्वागत आलं. पालखी उद्या सकाळी पुढच्या मुक्कामासाठी प्रयाण करणार आहे.

****

टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि कॅनडा संघांमध्ये सामना होणार आहे. हा सामना फ्लोरिडा इथल्या सेंट्रल ब्रॉवर्ड पार्क मैदानावर भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होईल.

****